आजचा शुभ विचार

स्वप्ने पाहणाऱ्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही. स्वप्नांच्या पीछ्याने जाताना, तुमच्या मनाची शक्ती वाढते.

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-65 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Saturday 12 July 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६५ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. १२ जुलै २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

## शिवसेना ठाकरे गट अन् मनसेच्या युतीवर बोलू नका, राज ठाकरेंचा आदेश

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांच्या युती संदर्भात कोणीही बोलू नये, असे आदेश मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. कोणत्याही पदाधिकाऱ्यांनी युती संदर्भात बोलताना आधी मला विचारायचे, असे आदेश राज ठाकरे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना दिलेत. त्यामुळे शिवसेना ठाकरे गट आणि मनसे या दोन पक्षांच्या युती संदर्भात संभ्रम निर्माण झाला आहे.

ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना राज ठाकरेंच्या या आदेशावर विचारण्यात आले. यावर चांगलंय ना...त्याच्यात काय, ते बोलतील ना त्यावर...अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरेंनी दिली. उद्धव ठाकरे आज विधानभवनात आले होते. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. दरम्यान, ठाकरे बंधूंचा मेळावा 5 जुलै रोजी मुंबईतील एनएससीआय डोममध्ये साजरा करण्यात आला. एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो आहोत, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी या मेळाव्यात भूमिका मांडली. मात्र राज ठाकरेंनी तेवढा युतीबाबत स्पष्टपणा बोलण्यातून दाखवला नाही.

एक स्पष्ट आदेश...पक्षातील कोणीही वर्तमानपत्रं, वृत्तवाहिन्या किंवा कोणत्याही डिजिटल माध्यमांशी संवाद साधायचा नाही. तसंच स्वतःचे प्रतिक्रियांचे व्हिडीओज सोशल मीडियावर टाकायचे हे पण अजिबात करायचं नाही. आणि माध्यमांशी संवाद साधण्याची अधिकृत जबाबदारी ज्या प्रवक्त्यांना दिली आहे त्यांनी देखील मला विचारल्याशिवाय, माझी परवानगी घेतल्याशिवाय कुठल्याही प्रकारच्या माध्यमांशी संवाद साधायचा नाहीये, आणि सोशल मीडियावर व्यक्त व्हायचं नाही, असं राज ठाकरेंनी एक्सवर पोस्ट करुन सांगितले.

एक स्पष्ट आदेश... पक्षातील कोणीही वर्तमानपत्रं, वृत्तवाहिन्या किंवा कोणत्याही डिजिटल माध्यमांशी संवाद साधायचा नाही. तसंच स्वतःचे प्रतिक्रियांचे व्हिडीओज सोशल मीडियावर टाकायचे हे पण अजिबात करायचं नाही.

राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात, मराठी माणसांची एकजूट व्हावी आणि स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न पूर्ण व्हावे, असे भावनिक आवाहन केले, पण भविष्यात युती कायम राहील, याबाबत कोणताही स्पष्ट संकेत दिला नाही. त्यामुळे युतीसाठी उद्धव ठाकरे यांनी हात पुढे केले असले तरी राज ठाकरे यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. आता मराठीच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे वीस वर्षांनी एकत्र आले असले तरी मनसे आणि ठाकरे गटाची युती होणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## मुंबईत बेस्ट बसेसची संख्या १० हजारांपर्यंत वाढवण्याची योजना; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभागृहात माहिती

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------------



मुंबईच्या बेस्ट उपक्रमामध्ये भाडेतत्वावर ६,५५५ बसेस घेण्यासाठी विविध पुरवठादारांसोबत करार केला आहे. त्यापैकी २,१६७ बसेस बेस्ट उपक्रमाच्या सेवेत दाखल झाल्या असून उर्वरित बसेससाठी त्यांच्याकडे पाठपुरावा सुरु आहे. येत्या ४ ते ५ वर्षात बेस्टच्या ताफ्यात किमान १० हजार बसेसची भर घालण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठीचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत लेखी उत्तरात दिली आहे.

मुंबईत बेस्ट बसेसची संख्या वाढविण्याबाबत आमदार राजेश राठोड, सतेज ऊर्फ बंटी पाटील, भाई जगताप यांनी तारांकित प्रश्न विचारला आहे. आयुर्मान संपुष्टात आलेल्या २,१६० बसेस मागील पाच वर्षात बेस्टने भंगारात काढल्या. तर, केवळ ३७ नव्या गाड्यांची खरेदी केली. मुंबईतील प्रवाशांना ३,३३७ बेस्ट बसेसची आवश्यकता आहे. कमी बसेसमुळे नागरिकांना गर्दी व बसच्या दीर्घकाळ प्रतिक्षेचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांची समस्या कमी करण्यासाठी बेस्ट बसच्या ताफ्यात अधिक बसेस समाविष्ट करण्यासाठी काय कार्यवाही केली आहे, असा प्रश्न केला आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी बेस्टच्या बस ताफ्यातील बहुतांश बसेसचे आयुर्मान संपल्यामुळे निष्कासित केल्या आहेत. परंतु, प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी भाडेतत्वावर बसगाड्या घेतल्या आहेत. बस पुरवठादार कंपन्यांकडून प्राप्त होणाऱ्या बसगाड्यांची संख्या अपुरी असल्यामुळे प्रवाशांच्या संख्येला अनुसरून बसगाड्या प्रवर्तित करण्यास मर्यादा येत आहेत. त्यामुळे पुरवठादारांना उर्वरित बसेस लवकर पुरवण्यास सांगण्यात आले आहे, असे लेखी उत्तरात म्हटले आहे.

## मारहाणीबाबत संजय गायकवाड यांची चौकशी होणार, कुणाच्याही तक्रारीची गरज नसल्याचं मुख्यमंत्र्यांनी केलं नमूद!

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



मुंबईतल्या आकाशवाणी आमदार निवासातील कॅन्टिनमधल्या एका कर्मचाऱ्याला मारहाण करतानाचा आमदार संजय गायकवाड यांचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. हे चुकीचं असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केल्यानंतर आणि गायकवाडांना समज दिल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केल्यानंतरही गायकवाड आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचं दिसून आलं. यानंतर आता खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांची पोलिसांकडून चौकशी केली जाईल, असं स्पष्ट केलं आहे.

विधिमंडळात यासंदर्भात विचारणा केली असता संजय गायकवाड यांच्याविरोधात कोणतीही तक्रार दाखल नसल्यामुळे त्यांची चौकशी करता येणार नाही, अशी भूमिका गृहराज्यमंत्र्यांनी मांडल्याबाबत माध्यम प्रतिनिधींनी देवेंद्र फडणवीसांना विचारणा केली. यावर उत्तर देताना देवेंद्र फडणवीसांनी वरील माहिती दिली.

देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनात माध्यम प्रतिनिधींच्या प्रश्नांवर सविस्तर उत्तर दिलं. “पोलिसांनी चौकशी केलीच पाहिजे. पोलीस याची चौकशी करतील. यासाठी कुणाचीही तक्रार येण्याची गरज नाही. दखलपात्र गुन्हा असेल तर पोलीस त्याची चौकशी करतील”, असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं.

“ काही गुन्हे दखलपात्र असतात, काही अदखलपात्र असतात. त्यानुसार याबाबतची कारवाई होईल. शेवटी किती ताकद लावली गेली, याच्या आधारावर त्या गुन्ह्याचं स्वरूप ठरतं. पोलिसांना कारवाई करू द्या, ते योग्य कारवाई करतील”, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास संजय गायकवाड बनियन आणि टॉवेल गुंडाळून आकाशवाणी आमदार निवासाच्या कॅन्टीनमध्ये दाखल झाले. त्यांच्या हातात डाळीची एक पिशवी होती. कॅन्टीनच्या कर्मचाऱ्यांना ते पिशवीतल्या डाळीचा वास घ्यायला सांगत होते. एका कर्मचाऱ्याला त्यांनी अशीच पिशवी नाकाशी नेऊन वास घ्यायला सांगितलं. त्यांच्यात काही शब्दांचीच देवाण-घेवाण झाली असेल-नसेल तोच संजय गायकवाड यांनी त्याला मारहाण करायला सुरुवात केली. आधी कानाखाली आणि नंतर थेट ठोसे लागवले. यात तो कर्मचारी खाली पडला. नंतर काही कार्यकर्त्यांनी संजय गायकवाड यांना तिथून बाजूला केलं. संजय गायकवाड यांच्या या कृतीवर खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भर सभागृहात नाराजी व्यक्त केली. आमदारांनी असं वर्तन करणं चूक असल्याचं ते म्हणाले. एकनाथ शिंदे यांनीदेखील संजय गायकवाड यांना समज दिल्याचं सांगितलं. मात्र, त्यानंतरदेखील संजय गायकवाड यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना आपल्या वर्तनाचं समर्थन केलं. शिवाय, दक्षिण भारतातील या लोकांनी महाराष्ट्रातील लोकांच्या आरोग्याशी खेळ चालवला असल्याचीही प्रतिक्रिया दिली. दरम्यान, एकीकडे संजय गायकवाड यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसताना दुसरीकडे संबंधिक कॅन्टीन चालकाचा परवाना अन्न व औषध प्रशासनाकडून रद्द करण्यात आला आहे. या केटररला कोणत्याही प्रकारे अन्नपदार्थ तयार करणे, विकणे वा वितरीत करण्यावर बंदी घालण्यात आली आहे

महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे
राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार
कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजिटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
SWARAJYADOOT LIVE
दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

सम्पादकीय

# मराठी अस्मितेला आव्हान कशाला?

भाषावार प्रांतरचनेनुसार, प्रत्येक राज्याची एक मातृभाषा आहे. महाराष्ट्रात मराठी, गुजरातमध्ये गुजराती, कर्नाटकात कन्नड, पंजाबमध्ये पंजाबी मातृभाषा आहे. महाराष्ट्रात हिंदी भाषेच्या शिक्षणातील सक्तीवरून जो वाद निर्माण झाला आहे, त्याच्या खोलामध्ये न जाता महाराष्ट्राबाहेर गायपट्ट्यात मराठी माणूस, मराठी अस्मितेला ठेच पोहोचविण्याचे प्रकार गैरसमजुतीने होत आहेत, त्याचा निषेध व्हायलाच हवा; पण महाराष्ट्रातील जनतेने राज्यातील सरकारची याबाबतीतली भूमिकाही समजून घ्यायला हवी.

केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रांची अंमलबजावणी करताना तिसरी भाषा म्हणून हिंदीसह अन्य भाषांचा शासन निर्णय राज्य सरकारने काढला होता. पहिलीपासून शिकणाऱ्या मुलांसाठी मराठी भाषेसोबत इंग्रजी आणि हिंदीसह अन्य तिसऱ्या भाषेचा पर्याय होता. मराठी भाषिकांच्या संघटनांकडून झालेल्या विरोधानंतर महाराष्ट्रात भाषेवरून वाद नको म्हणून यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून त्रिभाषा सूत्रांची अंमलबजावणी न करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने घेतला.

नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखालील समिती नेमून भाषेच्या तिसऱ्या पर्यायाबाबत अभ्यास करून सरकारला अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामुळे महायुती सरकारने जनभावनेचा आदर बाळगून, हिंदीसह अन्य तिसऱ्या भाषेचा पर्याय असावा की नसावा, यावरचा निर्णय समितीवर सोपविला आहे. त्यानंतर खरं तर या वादावर पडदा पडायला हवा होता; परंतु महाराष्ट्राबाहेरील निशिकांत दुबे या खासदाराने समस्त मराठी माणसांबद्दल काढलेल्या विधानाचे पडसाद महाराष्ट्रात उमटले. 'मराठी लोक आमच्या पैशांवर जगतात, तुमच्याकडे आहे काय?' असे वादग्रस्त विधान खासदार दुबे यांनी केले. महाराष्ट्र भाजपाच्या नेत्यांनी दुबे यांच्या विधानांचा निषेध केला आहेच ही बाब तितकीच अधोरेखित करण्यासारखी आहे.

पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अशी विधाने करणे योग्य नाही, कारण त्यातून निघणारा अर्थ लोकांच्या मनात गोंधळ निर्माण करतो, अशी स्पष्ट भूमिका मांडली. महाराष्ट्र आणि मराठीच्या पराक्रमाची साक्ष जगभर आहे. झारखंडच्या खासदाराने कायद्यात बसणारी भूमिका जरूर मांडावी, पण मराठी माणसाच्या कर्तृत्वावर, कर्तबगारीवर प्रश्नचिन्ह निर्माण करू नये, अशा शब्दांत सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी महाराष्ट्र सरकारची भूमिका विधानसभेत मांडत दुबे यांच्या टीकेला चोख प्रत्युत्तर दिले. आता महाराष्ट्र, मराठी माणूस यांची भूमिका अन्य प्रांतात राहणाऱ्या हिंदी भाषिकांनी समजून घेतली पाहिजे.

हिंदी भाषेला विरोध नाही तर शिक्षणात पहिलीपासून हिंदीचा आग्रह नको, अशी मराठी भाषिकांची साधी सोपी मागणी असताना, दुबे यांच्यासारख्या झारखंडमध्ये राहणाऱ्या लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का पोहोचेल, अशी विधाने का बरे करावीत? त्याचा उलट त्रास महाराष्ट्रात गेली अनेक वर्षे गुण्यागोविंदाने राहणाऱ्या अमराठी माणसांनाच होण्याची शक्यता आहे. त्यांच्यात दरी निर्माण करण्याचे काम अशी वादग्रस्त विधाने करून कशासाठी करायची. केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रांची अंमलबजावणी करण्याचे फर्मान राज्य सरकारने काढले असले, तरी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जाहीर केलेल्या या संदर्भातील भूमिकेनंतर भविष्यात केंद्र सरकारला या निर्णयावर किती फोकस करायचा, हे आगामी काळात कदाचित ठरवावे लागेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रवक्ते सुनील आंबेकर यांनी स्पष्ट केले आहे की, " राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची खूप आधीपासूनची भूमिका आहे की, भारतातील सर्व भाषा या राष्ट्रीय भाषा आहेत.

देशातील वेगवेगळ्या भागात राहणारे लोक तिथली भाषा, आपापली मातृभाषा बोलतात. त्यामुळे मुलांना प्राथमिक शिक्षण हे त्यांच्या मातृभाषेतच मिळालं पाहिजे असा आग्रह असतो. मातृभाषेत शिक्षण ही गोष्ट खूप आधीपासूनच ठरलेली आहे." आंबेकर यांच्या भूमिकेनंतर केंद्र सरकार आणि राज्य सरकार काय निर्णय घेणार हे प्रशासकीय पातळीवर दिसून येईल; परंतु 'मराठी लोक कोणाची भाकर खात आहेत? आमच्या पैशांवर तुम्ही मराठी लोक जगताय. मराठी लोकांकडे कोणते उद्योग आहेत? मराठी लोक किती टॅक्स देतात सांगा,' अशी दुबे यांची बेताल वक्तव्ये मराठी भाषेशी नव्हे, तर अस्मितेला ठेच पोहोचविणारी आहेत.

देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचे सर्वाधिक योगदान आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीत मराठी माणसांचे ऐतिहासिक योगदान आहेच, पण गेल्या चारशे वर्षांत परकीय आक्रमकांनी भारताची संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांनी भारताची संस्कृती जिवंत ठेवण्याचे काम केले, हे कोणीही विसरू शकणार नाही. 'मेरी झाँसी नहीं दूँगी,' असे इंग्रजांना ठणकावून सांगणारी झाँसीची राणी लक्ष्मीबाई मराठीच होत्या ना? हिंदी प्रदेशात राज्य चालविताना, त्यांनी स्थानिक भाषिकांवर कधी अन्याय केला नाही.

मुगल राजवटीत हिंदू मंदिरे नेस्तानाबूत करण्यात येत होती, तेव्हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी उत्तर प्रदेशातील काशी विश्वेश्वरच्या मंदिरापासून मध्य प्रदेशातील उज्जैन महाकाल मंदिरांचा जीर्णोद्धार करून, हिंदू समाजाची धार्मिक अधिष्ठाने जपण्याचा प्रयत्न केला. ग्वाल्हेरचे शिंदे घराणे, बडोद्यातील गायकवाड संस्थान, इंदूरच्या होळकर घराण्यांनी कधी मराठी-अमराठी वाद केला नाही. त्यामुळे महाराष्ट्राबाहेरील नेत्यांकडून महाराष्ट्र भाषा, अस्मितेवर कोणी बोट ठेवण्याचा प्रयत्न करणार असेल, तर ते मराठी माणूस कदापि खपवून घेणार नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी देशातील पहिले सागरी आरमार उभारले. देशात पहिला सिनेमा मराठी माणसाने बनवला. त्यामुळे ज्यांचा महाराष्ट्राशी संबंध नाही, त्यांनी मराठी माणसाच्या योगदानाबद्दल विचारू नये हा मंत्री शेलार यांनी मांडलेला मुद्दा योग्य म्हणावा लागेल. हिंदी (गाय) पट्ट्यांनी मराठीबाबतची भूमिका समजावून घ्यायला हवी. महाराष्ट्रात महायुती सरकारला प्रचंड बहुमत मिळाले त्यात मराठी मतदारांचा वाटा मोठा आहे. इथल्या मराठी माणसांचा विरोध हा हिंदीला नाही, तर केवळ हिंदी भाषा शाळेत पहिलीपासून अनिवार्य करण्यापुरताच आहे, एवढं लक्षात ठेवले तरी बरे.

# युवा वर्गामध्ये हृदयविकारांचा वाढता आजार चिंताजनक!

पुर्वी हृदयविकाराचे आजार (हार्डअटॅक) याबाबत एक वयोमर्यादा होती साधारणतः वयाच्या ६० वर्षांनंतर या आजारांचे प्रमाण जास्त रहायचे.परंतु गेल्या काही वर्षांत ३० ते ५० वर्षे वयोगटामध्ये हृदयविकाराच्या आजारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. कारण गेल्या काही वर्षांमध्ये प्रत्येक व्यक्तींची

रहानिमानाची, खानपानाची, मादक द्रव्ये व अन्य व्यसन यामुळे दिनचर्येच्या शैलीमध्ये मोठ्या प्रमाणात बदलाव आल्याचे दिसून येते.पंजाब मधील फिरोजपुर मधील गुरूहर सहाय या मैदानावर दिनांक २९ जून २०२५ रविवारला हरजीत सिंह नामक युवा क्रिकेट खेळाडू बैटींग करतांना छक्का मारला व अचानक हार्ट अटैक आला व तो तिथेच पडला आणि त्याचा मृत्यू झाला ही धक्कादायक बाब आहे.यामुळे सर्वांचेच हृदय हळूहळून आले व खेळाडूंमध्ये शोककळा पसरली.यापुर्वीही मुंबईमध्ये जून २०२४ मध्ये क्रिकेट मैचच्या दरम्यान राम गणेश तेवर नामक खेळाडूने छक्का मारल्या बरोबर हृदयविकाराचा झटका आला व क्रिकेट खेळतांना अशीच हृदयद्रावक घटना घडली व या ४२ वर्षीय या खेळाडूचा मृत्यू झाला.२०२४ मध्ये अशाप्रकारे पुणे येथील गरवारे स्टेडियममध्ये इमरान पटेल नामक खेळाडू ३५ वर्षीय क्रिकेट मैच खेळताना हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला.यावरून स्पष्ट होते की अटैकचे (हृदयविकाराच्या आजारांचे) प्रमाण दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे.हृदयविकाराच्या मृत्यूचे अनेक कारणे असू शकतात मादक द्रव्ये सेवन करणे, धुम्रपान, तंबाखू, गुटका,मद्य सेवन यांचाही हृदयविकारावर मोठ्या प्रमाणात गंभीर परिणाम होतो व पुढे चालून मृत्यूचे कारण बनत असते.त्याचप्रणाणे मोबाईलचा जास्त प्रमाणात वापर, वाढता तनाव, अनियमित जीवनशैली, दिनचर्येत फास्ट फूडचे वाढते प्रमाण, आहाराची ढासळती गुणवत्ता,वेळोवेळी आरोग्याची काळजी न घेणे व व्यायामाचे कमी प्रमाण,वाढते लठ्ठपणा,इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम युवावर्गामध्ये होत असल्याने हृदयविकाराच्या आजारांचाधोका वाढतो आहे. युवावर्गामध्ये हृदयविकाराच्या आजारांमध्ये भर टाकली(बीपी व शुगर)डायबिटीजने हाई ब्लड शुगरचा सरळ प्रभाव हृदयविकाराच्या आजारांवर होतो.या आजारांचे मुख्य कारण म्हणजे मसालेदार पदार्थ, ऑयली फूड, फास्ट फूड,अती कोल्ड्रिंक्स घेणे आणि मिठाई यामुळे डायबिटीजचे प्रमाण वाढुन सरळ हृदयविकारांचे आजार होत आहे किंवा होवू शकतात.सोबतच सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे व वाढत्या प्रदूषणामुळे सुध्दा हृदयविकाराचे आजार दिसून येतात.आपण पाहिले की सध्याच्या परिस्थितीत अनेक अभिनेता,गायक, हास्य कलाकार आणि निर्देशक याचा हृदयविकाराच्या आजारांनी मृत्यू झाल्याचे आपण पाहिले.यात वयोमर्यादा ३०,४०,५० वर्षे अशा प्रमाणे कमी वयोमर्यादा आहे.या वयात हृदयविकाराच्या आजारांने मृत्यू (हार्डअटॅक) होत असेल तर ही बाब अत्यंत चिंताजनक, गंभीर व धक्कादायक आहे.त्यामुळे वाढते हृदयविकारांचे आजार पहाता सर्वांनीच आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

-------------------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

# दत्तनगर चुंचाळे, अंबड (जि. नाशिक) येथील स्व. मुकेशभाई पटेल प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------------



शैक्षणिक गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या अंबिका मित्र मंडळ संचलित स्व. मुकेशभाई पटेल प्राथमिक विद्यालय, दत्तनगर चुंचाळे येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल यश संपादन करून विद्यालयाचे नाव राज्यपातळीवर उज्वल केले आहे.

यंदाच्या परीक्षेत विद्यालयातील एकूण १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीस पात्रता मिळवली असून, त्यात ऋतुजा विनोद भगत हिने उल्लेखनीय कामगिरी करत गुणवत्तायादीत स्थान मिळवले आहे. तिच्या या कामगिरीमुळे संपूर्ण विद्यालयात आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

इतर यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

१) स्वरा निलेश बुलाखे
२) विराज समाधान साबळे
३) रूथ मनोज भालेकर
४) ऋतुजा विनोद भगत

या विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांची सातत्यपूर्ण मेहनत, अभ्यासातील शिस्त व चिकाटी, आणि शाळेतील शिक्षकांनी केलेले प्रभावी मार्गदर्शन हे महत्त्वाचे घटक ठरले. शाळेने विद्यार्थ्यांसाठी परीक्षा पूर्व सराव सत्र, वेळापत्रकानुसार अभ्यास, व स्पर्धा परीक्षेची मानसिक तयारी यावर भर दिला.

विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी सज्ज करण्यासाठी श्रीमती रंजना मांडवडे आणि सौ. शितल पगार या दोन शिक्षिका विशेष उल्लेखनीय ठरल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना वैयक्तिक लक्ष देऊन, शंका निरसन करून, आणि सतत सराव घेवून परीक्षेसाठी पूर्ण तयारी करून घेण्यात आली. शिक्षकांचा हा प्रयत्न विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वृद्धीसाठी अत्यंत फायदेशीर ठरला.

या यशाबद्दल संस्थेचे मा. अध्यक्ष बाळासाहेब विनायक पाटील, सचिव मा. संदीप (अमोल) बाळासाहेब पाटील, तसेच प्रशासन अधिकारी मा. आर. सी. सोनवणे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांचे हे यश हे शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीचे प्रतिक आहे आणि अशा विद्यार्थ्यांमुळेच संस्थेचे नाव उज्वल होत आहे."

कार्यक्रमप्रसंगी मुख्याध्यापक श्री. सागर सुरेश पाटील, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शिक्षक-शिक्षिका, पालक वर्ग, आणि ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित पालकांनी आपल्या पाल्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत शाळेच्या शिक्षकवर्गाचे आभार मानले.

विद्यार्थ्यांचे हे यश भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षांमध्ये भाग घेण्यासाठी प्रेरणादायी ठरणार असून, शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही आत्मविश्वास मिळेल. विद्यालयाचे हे यश शिक्षण क्षेत्रात एक आदर्श ठरेल, अशी आशा सर्वांनी व्यक्त केली.

# ओम साई राम ग्रुप कडून गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा...!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



गुरुपौर्णिमा हा गुरुचा दिवस नसुन तो शिष्यचा दिवस आहे या दिवशी शिष्य आपल्या गुरुला वंदन करत त्याचे आभार मानतो, गुरू या शब्दातच सामर्थ्य आहे. जीवनाला गती देणारे बळ आहे. जीवनाला आकार, आधार देणारा गुरू भारतीय संस्कृतीत ईश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे. गुरुपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीत गुरूचे स्मरण करण्याचा दिवस. असं म्हणतात की, मातृऋण, पितृऋण व गुरूचे ऋण कधीच फिटत नाही. व्यक्तीच्या जन्मानंतर त्याचा पहिला गुरू असतो आई, मग आयुष्याला मार्ग दाखवणारा आपला मार्गदर्शक गुरू. खरं तर जी व्यक्ती आपल्याला नवी वाट दर्शवते, जीवनाला गंध देणारं नव ज्ञान देते, आपली चूक नकळत सुधारते, ती व्यक्ती जीवनात आपल्या गुरूच्या स्थानी जाते. मग तो एखादा मित्र असू दे, आपला जीवनसाथी असू दे, नसता आपल्यापेक्षा लहान आपल्या वर्गातला छोटा निरागस विद्यार्थी. तसं तर आपणच त्याला शिकवण्यासाठी नियुक्त असतो; पण ब-याचदा तोच जीवनातल एखादं सत्य अगदी सहजतेने उलगडून देतो व आपल्याला शिकवतो. 'गुरुविना देव दुजा पाहता नाही त्रैलोकी, गुरू हा सुखाचा सागरू, गुरू हा प्रेमाचा आगरू, गुरू हा धैर्याचा डोंगरू, कदाकाळी डळमळी ना...!

गुरुपौर्णिमा उत्सव निमित्त ओम साई राम ग्रुप संघटनेच्या वतीने सद्गुरू श्री साईनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली व आपल्या गुरुला वंदन केले या प्रसंगी संघटनेचे अध्यक्ष किरण भैय्या पाकळे, वासुदेव बागुल, देवीदास बागुल,अमोल महाले, सागर मोरे, भुषण महाले, लखन पाटील, नन्या सासके, रोहित पवार, साहिल खाटीक,इतर साईभक्त उपस्थित होते

# तांदुळवाडी येथील एम.डी. काळे इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये गुरूपोर्णीमा उत्सव साजरा

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



गुरूविण न मिळे ज्ञान ,ज्ञानाविना न होई जगी सन्मान जीवन भवसागर तराया चला वंदू गरूराया असे म्हणत तांदुळवाडी येथील एम. डी काळे स्कूल मध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गुरूंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी चेअरमन दिनेश काळे सर प्राचार्य नेहा काळे मॅम व व्हाईस प्रिन्सिपल साक्षी अहिरे यांनी

सदगुणांचा ध्यास आणि स्वतःला घडवण्याचा प्रत्येक प्रयत्न हीच खरी गुरुपौर्णिमा चे महत्व सांगितले विद्यार्थ्यांनी देखील गुरु शिष्यांच्या छान छान कथा सांगितल्या. सचिन पाटील सर यांनी सूत्रसंचालन केले कविता आयनोर व प्राजक्ता काकळीज यांनीही गुरु के बिना ज्ञान नाही ज्ञान के बिना कोई महान नही याबद्दल गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. तसेच शिक्षिका , वंदना इंगोले, शिक्षक प्रभाकर आहेर, ज्योती बोरसे, अर्चना इंगोले, भाग्यश्री सूर्यवंशी , ज्योती सुरसे,पूजा झेडें ,मेघा पवार, नूतन खैरनार ,नम्रता कोळी, ऐश्वर्या सोमासे अश्विनी घोडेराव यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

# प्रणव क्लासेसमध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त शालेय दप्तर वाटप व गुणवंत विद्यार्थिनीचा सत्कार उत्साहात

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------------







भारतीय संस्कृतीत गुरुपौर्णिमा हा दिवस गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विशेष मानला जातो. गुरु-शिष्य परंपरेचा सन्मान राखत 'प्रणव क्लासेस, नाशिक' यांच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांसाठी शालेय दप्तर वाटप व गुणवंत विद्यार्थिनीचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमाचे उद्घाटन सौ. ज्योतीताई कवर (भावी नगरसेविका), प्रणव क्लासेसचे माजी विद्यार्थी सुमित शामराव दातीर (भावी नगरसेवक), व नाशिक महापालिकेतील कामगार नेते कमलाकर भाऊ दिवे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन क्लासच्या संचालिका सौ. सुमित्रा कमलाकर पाटील आणि गुंजन कमलाकर पाटील यांनी केले होते. त्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, शिस्त, आणि गुरुजनांप्रती आदर बाळगण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच समाजात शिक्षणाची उर्जा पोहचवणं हाच आमचा हेतू असल्याचे सांगितले.

या वेळी प्रणव क्लासेसच्या माजी विद्यार्थिनी कुमारी साक्षी गौतम दोंदे हिचा विशेष सत्कार करण्यात आला. साक्षीने १२ वी विज्ञान शाखेत नाशिकमधील नामांकित गुरु गोविंद सिंह कॉलेज मधून विशेष प्रावीण्य मिळवले आहे. तिचा सत्कार प्रमुख पाहुणे सौ. ज्योतीताई कवर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व गौरवचिन्ह देऊन करण्यात आला. तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात तिचा गौरव केला.

यावेळी विद्यार्थ्यांना शालेय दप्तर वाटप करण्यात आले. नवीन दप्तर हाती घेताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे आनंदाचे हास्य सर्वांच्या लक्षात राहिले. या उपक्रमामुळे अनेक पालकांनी समाधान व्यक्त करत प्रणव क्लासेसच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. शिक्षणसामग्रीचे वाटप हे केवळ साहित्याचे नव्हे तर प्रेरणेचेही माध्यम ठरत असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी केले.

कार्यक्रमादरम्यान सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणातून शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांना नियमितपणे अभ्यास करत स्वतःच्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करण्याचे संदेश दिले. तसेच "गुरुंचा आशीर्वाद आणि मार्गदर्शनच जीवनाला योग्य दिशा देतो" असे विचार व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांसाठी आणि पाहुण्यांसाठी प्रीतीभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. जुने विद्यार्थी, सध्याचे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांनी याचा मनमुराद आस्वाद घेतला.

हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ शैक्षणिक मदतीचा नव्हे, तर एक सकारात्मक प्रेरणेचा ठरला. सामाजिक संवेदनशीलता आणि शिक्षणाचा प्रसार याचे सुंदर उदाहरण ठरलेला हा उपक्रम दरवर्षी सातत्याने राबवावा, अशी सर्वांची अपेक्षा होती. कार्यक्रम संपूर्ण उत्साही वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या टाळ्यांच्या गजरात संपन्न झाला.




शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# नूतन मराठा विद्यालय छडवेल कोरडे येथे स्वामी विवेकानंद पुण्यतिथी साजरी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------







आज नूतन मराठा विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय, छडवेल कोर्डे येथे स्वामी विवेकानंद पुण्यतिथी व अमेरिकेचा स्वातंत्र्य दिन (स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रकाशन) दिन व जाहीरनामा निर्माते थॉमस जेफरसन यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला

स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना विद्यालयाचे प्राचार्य मा.रावसाहेब संजयकुमार पाटील, पर्यवेक्षक दादासाहेब रघुनाथ नागरे,डॉ सागर पाटील, डॉ. मेघा खैरनार, डॉ.सीमा वळवी, शिक्षक प्रतिनिधी हरकलाल पवार, शिक्षकेतर प्रतिनिधी भाऊसाहेब सिद्धार्थ मोहिते व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमाचे दिनविशेष विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. निलेश साळुंखे सर यांनी सादर केला यात अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यामुळे जगाला "समानता व स्वातंत्र्य" ही मूल्ये दिली हे आपल्या दिनविशेषातून त्यांनी स्पष्ट केले.

विद्यालयाचे प्राचार्य मा.रावसाहेब संजयकुमार पाटील यांनी आपल्या मनोगतातून युवकांचे प्रेरणास्थान असलेले स्वामी विवेकानंद यांचा परिचय करून देताना आजच्या विद्यार्थ्यांनी युवकांनी युवतींनी यशासाठी चार मूल्य जोपासावीत आवर्जून लक्षात ठेवावी

मेहनत
चिकाटी
संयम
पवित्रता ....

एक अतिशय सुंदर विदेशी महिला स्वामी विवेकानंद यांच्याकडे येऊन म्हणाली मला तुमच्याशी लग्न करायचा आहे त्यावर स्वामीजी म्हणाले मी तर संन्याशी आहे परत ती महिला म्हणाली मला तुमच्यासारखा गौरवशाली सुशील व तेजोमय पुत्र हवा आहे हे तुमच्याशी लग्न केल्यानंतरच शक्य आहे यावर विवेकानंद म्हणाले एक उपाय आहे आज पासून तुम्ही माझ्या आई व्हा *मी तुमचा पुत्र होतो* तुम्हाला माझ्या रूपाने माझ्यासारखा मुलगा मिळेल त्यानंतर त्या महिलेने स्वामीजींच्या पायावर आपले डोकं ठेवलं आणि म्हणाली तुम्ही साक्षात ईश्वराचे रूप आहात असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. नितीन बेडसे सर यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# संतांनी समाजात नैतिकता रुजवली – डॉ. प्रज्ञा कुलकर्णी

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------





"संतांनी अध्यात्माचे खऱ्या अर्थाने उपयोजन केले. लोकांना लोकांच्या भाषेतच अध्यात्म समजावले" आणि खऱ्या अर्थाने समाजात नैतिकता रुजवली, असे प्रतिपादन डेक्कन महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. प्रज्ञा सुहास कुलकर्णी यांनी केले.

दिनांक ९ जुलै रोजी सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात सोनोपंत दांडेकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. "समकालीन विद्यार्थी आणि संत साहित्य" या विषयावर डॉ. प्रज्ञा कुलकर्णी यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

संत आणि भगवंत यातील भेद सांगत कुलकर्णी यांनी चाणक्यापासून ते समर्थ रामदासांपर्यंत संतांचे लोकोपयोगी विचार उपस्थितांसमोर मांडले. परंपरा पुढे नेताना त्यातील ताज्यता कळली पाहिजे. आंतरिक पातळीवर आपण सुंदर झालं पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण सावे यांनी आपल्या प्रास्ताविकातून सोनूमामांच्या उत्तम मानसशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ या पैलूंवर प्रकाश टाकला. मामासाहेबांच्या शिक्षण विषयक स्वप्नांचा पालघरवासीयांनी आदर केला आहे, त्यांच्या कृतज्ञतेत राहिले आहेत असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष सीए सचिन कोरे यांनी केले. माणसात एक परिपूर्ण व आदर्श माणूस म्हणून बदल होत नाहीत तोपर्यंत संत साहित्य अजरामर राहील असा विचार अध्यक्षीय समारोपात सुधीर दांडेकर यांनी मांडला. सोबत त्यांनी सुख, आनंद, यश या संकल्पनांवर विविध दाखल्यांसह प्रकाश टाकला. तसेच चारित्र्यनिर्माणाचे महत्व अधोरेखित केले. संस्थेचे उपाध्यक्ष प्रताप वारैय्या, विश्वस्त प्रा. अशोक ठाकूर, कोषाध्यक्ष मंगेश पंडित, सचिव सुधीर कुलकर्णी आणि अनिल पाटील, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पायल चोलेरा तसेच संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनघा पाध्ये-देशमुख यांनी केले तर आभार डॉ. रोहित गायकवाड यांनी मानले.

# गोंदिया शहरात वेश्याव्यवसायावर पोलिसांचा मोठा घाव! स्पा सेंटरवर धाड – दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------




जयस्तंभ चौक परिसरातील 'मॉस मेकअप स्टुडिओ ॲण्ड द बॉडीज स्पा सेंटर' येथे मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर स्थानिक गुन्हे शाखेने धाड घालून मोठी कारवाई केली. या कारवाईत स्पा सेंटरचे मालक व त्याचा भाऊ अशा दोघांविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई

दि. १० जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली होती की, जयस्तंभ चौकाजवळील बस स्थानकासमोरील स्पा सेंटरमध्ये अनैतिक कृत्ये सुरू आहेत. पोलीस अधीक्षक मा. गोरख भामरे यांच्या सूचनेनुसार व पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून धाड टाकण्यात आली. रुममध्ये ग्राहकासोबत महिला आढळली धाड टाकल्यानंतर एका खोलीत बेडवर एक महिला व ग्राहक आढळून आले. प्राथमिक चौकशीत सदर महिलेस वेश्याव्यवसाय करण्यास मालक बळिराम बस्ताराम घोटेकर व त्याचा भाऊ दिलीप बस्ताराम घोटेकर जबरदस्ती करतात, अशी माहिती समोर आली. त्यानंतर पहिल्या मजल्यावर चार महिला सुद्धा आढळून आल्या. त्यांनीही त्याच प्रकारे जबरदस्ती वेश्याव्यवसाय करणे भाग असल्याची माहिती दिली.

आरोपींची माहिती

बळिराम बस्ताराम घोटेकर (वय ३५)

दिलीप बस्ताराम घोटेकर (वय ३२) दोघेही रा. रेलटोळी, कस्तुर हॉटेलजवळ, गोंदिया या दोघांविरुद्ध गोंदिया शहर पोलीस ठाण्यात गु. र. क्र. ५४६/२०२५, भादंवि कलम ३, ४, ५, ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गेडाम हे करीत आहेत.

कारवाईतील सहभागी अधिकारी:

ही धाडसत्र स्थानिक गुन्हे शाखा व 'बेटी बचाव – नशा हटाव' राष्ट्रीय अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आले. या कारवाईत सपोनि धीरज राजुरकर, पोउपनि वनिता सायकर, पोहवा राजेंद्र मिश्रा, संजय चव्हाण, महेश मेहर, रियाज शेख, प्रकाश गायधने, सोमेन्द्रसिंग तुरकर, संतोष केदार, राकेश इंदुरकर, छगन विठ्ठले, स्मिता तोंडरे व राम खंडारे आदींचा समावेश होता. गोंदिया पोलिसांची ही धडक कारवाई शहरातील अनैतिक धंद्यांना चपराक ठरेल अशीच अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# आदित्य मोरे यांची शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत निवड टाकळी लोणार जि.प.प्रा. शाळेचा गौरव

पल्लवी शेलार
श्रीगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------




टाकळी लोणार (ता. श्रीगोंदा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आदित्य हुमदेव मोरे याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५वी) शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्ता यादीत आपले स्थान मिळवले आहे.

फेब्रुवारी २०२५ मध्ये देऊळगाव केंद्रावर झालेल्या या परीक्षेत आदित्यने एकूण ३०० गुणांपैकी २५० गुण मिळवत ११६ वा क्रमांक पटकावला. या यशामुळे टाकळी लोणार शाळेचा गौरव झाला आहे.

आदित्यला यश मिळवण्यासाठी वर्गशिक्षिका सौ. सविता (वाव्हळ मॅडम), मुख्याध्यापक राजाराम घोडके सर, रविंद्र वाव्हळ सर, सदाशिव मोरे गुरुजी तसेच संपूर्ण शिक्षकवृंद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजी भांडवलकर, उपाध्यक्ष शरद गलांडे, सरपंच अर्चना ताई दरवडे, उपसरपंच गुलाब शेख तसेच संतोष दरवडे, सर्जेराव कदम, कैलास मते, अप्पासाहेब रोडे, युवराज पळसकर, अल्ताफ शेख, अजिनाथ मोतेकर, संतोष टकले, नितीन शेळके, संदीप बोत्रे यांनी अभिनंदन केले.

तसेच केंद्रप्रमुख माणिकराव आढाव साहेब, विस्तार अधिकारी निळकंठ बोरुडे व गटशिक्षणाधिकारी सत्यजित मच्छिंद्र आणि कुसूमकुमार कानडी यांनीही आदित्यचे व शाळेचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार अर्पण करत साक्री नगरपंचायतीत ठिय्या आंदोलन!

## नगराध्यक्ष जयश्री पवार व नगरसेविका मनिषा देसले यांचे उपोषण; विकासकामांवरील प्रशासकीय अडथळ्यांचा निषेध

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत




साक्री नगरपंचायतच्या मुख्याधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीविरोधात आणि विकासकामांच्या टेंडर प्रक्रियेतील विलंबाचा निषेध करत नगराध्यक्ष मा. जयश्री पवार आणि प्रभाग क्रमांक ५ च्या नगरसेविका सौ. मनीषा देसले यांनी नगरपंचायत कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार अर्पण करत त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

गेल्या तीन महिन्यांपासून विविध विकासकामांसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून देखील त्या अद्याप खुल्या करण्यात आलेल्या नाहीत. परिणामी, मंजूर निधी असूनही विकासकामांना गती मिळत नाही, असा आरोप नगरसेवकांनी केला आहे.

मुख्याधिकारी मुद्दामहूनच विकासकामांमध्ये अडथळे निर्माण करत असल्याचा आरोप करत नगरसेवकांनी कार्यालयात उपोषण सुरू केले. यावेळी पाचही नगरसेवक उपस्थित होते. जबाबदार अधिकारी अनुपस्थित असल्याने असंतोष आणखी तीव्र झाला.

दि. ३ मार्च रोजी प्रभाग क्र. ५, ८ व १७ मधील विविध कामांसाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. त्या ११ मार्चपर्यंत खुल्या होणे अपेक्षित होते. मात्र आजपर्यंत त्या उघडल्या गेल्या नाहीत. उलट १७ मार्च रोजी प्रसिद्ध झालेली चंद्रकांत मंगल कार्यालयाच्या संरक्षण भिंतीची निविदा २५ मार्च रोजी उघडून काम देण्यात आले, ही बाब संशयास्पद असल्याचे मनिषा देसले यांनी म्हटले आहे.




मुख्याधिकारी राजकीय दबावामुळे विकासकामांना जाणिवपूर्वक अडथळा निर्माण करीत असून नगरसेवकांना त्रास देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. ही बाब वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहचवण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या आंदोलनात मा. नगराध्यक्ष जयश्री पवार, नगरसेविका मनिषा देसले, पुनम काकूस्ते-शिंदे, जयश्री पगारिया, उज्वला भोसले, सोनल पाटील, जया जाधव, हेमांगी मोहने, मंगल सोनवणे, भाग्यश्री पाटील, हर्षिता चित्ते, पुनम पाटील, सुवर्णा बोरसे, स्नेहल बोरसे, नगरसेवक दीपक वाघ, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विजय भोसले, महेंद्र देसले, विनोदकुमार पगारिया, हेमंत पवार, जगदीश शिंदे आदींची उपस्थिती होती.

# वडांगळी येथील मठात गुरुपौर्णिमा उत्साहात

## वीरशैव लिंगायत समाजाने पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांची काढली हत्तीवरून मिरवणूक

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



सिन्नर तालुक्यातील वडांगळी येथे गुरू गंगाधर शिवाचार्य वडांगळीकर मठात गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी सहा वाजता गुरू गंगाधर शिवाचार्य महाराज यांच्या संजीवन समाधीस रुद्राभिषेक करण्यात येऊन विधीवत पूजा ,आरती करण्यात आली त्यानंतर सुशोभित केलेल्या पालखीतून गुरू गंगाधर स्वामींच्या चांदीच्या मूर्तीची भव्य सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.मिरवणुकीत नाशिक,छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, धुळे,जळगाव जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने वीरशैव लिंगायत बंधू, भगिनी सहभागी झाल्या. गुरू गंगाधर शिवाचार्य महाराज, जगद्गुरु पंचाचार्य महाराज, महामंडलेश्वर पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला. भजनी मंडळात तल्लीन होऊन फेर धरून महिला नाचत असतानाचे दृश्य आनंददायी होते. या वर्षीचे मुख्य आकर्षण म्हणजे, वडांगळीकर महाराज यांची हत्तीवरून काढलेली भव्य मिरवणूक होते.गावातून निघालेल्या मिरवणुकीत महाराजांवर पुष्पवृष्टीचा वर्षाव करण्यात आला हे दृश्य विलोभनीय होते. मिरवणुकीतील कार्यकर्त्यांचा व भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता.गावातून निघालेली ही मिरवणूक किर्तांगळी रस्त्यावर असलेल्या मठ संस्थांनच्या, वीरभद्र मंदिराच्या प्रांगणात विसावली. या ठिकाणी असलेल्या सभागृहात सर्व भक्तगण एकत्र जमले. वडांगळीकर महाराजांचे आगमन झाल्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली.यावेळी इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत गुणवत्ता संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा विविध भेटवेस्तू ,मेडल व प्रशस्तीपत्र देऊन महाराजांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.श्यामसुंदर झळके यांनी आपल्या मनोगतात, गुरुपौर्णिमा साजरी करण्यामागचा उद्देश व गुरूचे महत्व विषद केले. त्यानंतर प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचे आशिर्वचनपर प्रवचन झाले.यातून त्यांनी गुरुपौर्णिमा बद्दल माहिती देऊन गुरू शिष्याची प्राचीन परंपरा विषद करून,संसाररुपी भवसागरतून पार होण्यासाठी गुरूच्या आशीर्वाद व मार्गदर्शनाची गरज असते.हे सांगून नित्य शिवपूजा, इश्टलिंग पूजा व सत्कर्म करण्याचे आवाहन केले.या नंतर सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी बुधवारी झालेल्या गुरुदीक्षा सोहळ्यात सुमारे १७० भाविकांनी महाराजांकडून दीक्षा घेतली.कार्यक्रमासाठी महाप्रसादाचे आयोजन पेठ येथील संतोष देशमुख यांनी केले तर सतीष स्वामी, संतोष कबाडे, निलेश हिंगमिरे,प्रशांत स्वामी,बंडू गाडे,पाराजी ताकटे, वैष्णवी कबाडे,सुवर्णा ताकाटे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. सूत्रसंचालन अभिषेक झाने यांनी केले तर आभार रवींद्र गाडे यांनी मानले.

# ठेकेदार आणि अभियंता भ्रष्टाचारात बुडाले; भाजप नेत्यांनी डोमेश चौरागडेंचा घणाघात?

## उद्घाटनाच्या दिवशीच उघड झाली बांधकामातील बिघाडांची पोतडी?

## तलाठी कार्यालयाच्या नव्या इमारतीत दराड्या, गटार नाही, पावसाचं पाणी थेट वीजेवर?

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------








गोरेगाव तालुक्यातील कटंगी बुजुर्ग येथील नव्याने बांधलेल्या तलाठी कार्यालयाच्या उद्घाटनाच्या दिनांक ११/०७/२०२५ दिवशीच बांधकामातील खळबळजनक दोष उघडकीस आले आहेत. अवघ्या सहा महिन्या पूर्वी बांधलेली इमारत उद्घाटनाच्या दिवशीच दरडांनी भरलेली दिसली. माजी पंचायत समिती सदस्य डोमेश चौरागडेंनी या प्रकरणात थेट अभियंते आणि भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करत भाजपच्या ठेकेदारांवर टीका केली आहे.

तलाठी कार्यालय कटंगी बुजुर्ग साझा क्रमांक ०७ व मंडळ अधिकारी सर्कल कुराडी येथील प्रकार

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत या तलाठी कार्यालयाचे बांधकाम करण्यात आले. मात्र उद्घाटनाच्या वेळीच समोर आलेल्या दोषांनी संपूर्ण गावात खळबळ उडवली आहे. "पुरातन टाइल्स रंगवून लावल्या, गडर बसवले नाही, पावसाचे पाणी थेट विजेच्या लाईनवर पडते आणि गेट व्यवस्थित बंद होत नाही," असा गंभीर आरोप चौरागडेंनी केला.

इमारतीच्या मागील बाजूस मोठी पाण्याची टाकी असून तीथून साचणाऱ्या पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया, डायरियासारख्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. तसेच, पावसाच्या पाण्याने इमारतीत सीपेज होऊ लागले असून, लाईटवर पाणी पडल्याने शॉर्टसर्किट होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

"भाजपचे लोक जर ठेकेदारी करतील तर महायुतीच्या सरकारच्या दबावामुळे अधिकारी व अभियंतेही निर्णय घेताना प्रभावाखाली येतात. आणि त्यातूनच असा दर्जाहीन आणि धोकादायक बांधकामाचा प्रकार घडतो, " असे चौरागडे म्हणाले.

शौचालयाची अवस्था अत्यंत दयनीय असून गटारच बसवलेले नाही. मातीचा योग्य भर न दिल्याने पावसात धोक्याची शक्यता अधिक वाढली आहे.

अनेक वेळा तक्रारी करूनही संबंधित अभियंते व ठेकेदारांनी दुर्लक्षच केले.

संबंधित अभियंता तसेच ठेकेदार यांनी बिल्डिंग कशी बनवली यावर गावातील नागरिकांनी सांगितले की फक्त भ्रष्टाचारला बढावा देण्याकरिता असे काम केले?

सार्वजनिक बांधकाम जिल्हा परिषद गोंदिया विभागाच्या अंतर्गत गोरेगाव उपविभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांनी का दखल घेतली नाही व संबंधित अभियंता व ठेकेदार यांच्या वर कोणती कारवाई होणार यावर मोठे प्रश्न निर्माण झाले आहे

या उद्घाटनप्रसंगी गावचे सरपंच, माजी पंचायत समिती सदस्य, ग्रामसेवक, संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र त्यांच्या समोरच या नव्या इमारतीच्या भ्रष्टाचाराचे वास्तव समोर आले.

“सरकारकडून लाखो रुपयांचा निधी या कार्यालयासाठी खर्च झाला, पण त्याचा दर्जा काय? बिल निघाले का? की निघालेल्या बिलामागे भ्रष्टाचार दडलेला आहे?” असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

# जनता विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालय गोरेराम लेन नाशिक येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी. मा. मुख्याध्यापक के. के. तांदळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते . गुरु पौर्णिमेचा दिवस हा आपल्या गुरू प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा पवित्र दिवस आहे . हे या कार्यक्रमाच्या माध्यमातून सांगितले गेले.

**गुरु हा संत कुळीचा राजा |**
**गुरु हा प्राण विसावा माझा |**
**गुरुविण कोण दाखवील वाट |**
**जीवनपथ हा, अवघड डोंगर घाट ||**

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांनी प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर हा जनता विद्यालय शाळेतील श्रीमती वाय . बी . गायधनी व जेष्ठ शिक्षिका के एन सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता १० वी क च्या विद्यार्थ्यांनी केले असून वर्गशिक्षिका के .एस .वाघ आणि शालेय सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती एस. एम. गायखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन इयत्ता १० वी क ची विद्यार्थिनी कु. संस्कृती थोरवे हिने केले.इयत्ता ८ वी अ ची विद्यार्थिनी कु. माही बागडे हिने गुरुजनांप्रती गीत सादर केले व ९ वी ब ची विद्यार्थिनी समृद्धी हारकळ हिने गुरुपौर्णिमेबद्दल थोडक्यात माहिती सांगितली.कार्यक्रमाच्या समारोपात सर्व शिक्षकांना गुलाब पुष्प देऊन व छोटीशी भेट वस्तू देऊन त्यांचे आभार मानण्यात आले . त्यांच्या योगदानाबद्दल आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात ते करत असलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी बाल शिक्षण मंदिर शाळेचे मुख्याध्यापक, जनता विद्यालय गोरेराम लेन शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जनतेचा आवाज बंद करणाऱ्या जनसुरक्षा विधेयकावर विरोधक गप्प का?

## समविचारी कार्यकर्ते पत्रकारांची तातडीने बैठक घेवून विचार मंथन करावे

## मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांचे आवाहन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत




सभागृहात बहुमताने जनसुरक्षा विधेयक मंजुर होत असतांना विरोधकांचे गप्प राहणे धोकादायक आणि चिंताजनक असून या कायद्याचा धोका राजकीय पक्षांपेक्षा चळवळीतील कार्यकर्त्यांना अधिक आहे. तसेच चौथ्या स्तंभाचे स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी जनतेचा आवाज बंद करणाऱ्या विधेयकाला विरोध करण्यासाठी समविचारी कार्यकर्त्यांची व पत्रकारांची तातडीची बैठक घेऊन विचारमंथन व्हावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केले आहे.

एस.एम. देशमुख यांनी पुढे म्हटले आहे की, प्रश्न सत्ताधाऱ्यांचा नाही.. जनतेचा आवाज बंद करण्यासाठी त्यांना जे शक्य आहे ते करीत राहणारच..ज्यांना आम्ही सपोर्ट करतो ते विरोधक काय करतात हा कळीचा मुद्दा आहे.. १२-१३ कोटींची लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रातून जनसुरक्षा विधेयकाला विरोध करणाऱ्या फक्त १२०० हरकती? त्यातही आम्ही म्हणजे पत्रकारांनी पाठविलेल्या किमान ५०० हरकती.. १०-५ हजार हरकती पाठवू शकतील एवढीही ताकद राज्यात विरोधकांची उरली नाही? समितीत नाना पटोले, जितेंद्र आव्हाड होते.. त्यांनी तिथे काय दिवे लावले ?याचा खुलासा त्यांनी करायला हवा.. सभागृहात विरोधक गप्प का बसले? त्यांनी विधेयकास विरोध का केला नाही? पत्रकार संघटनांनी एकत्र येत मुंबईत आंदोलन केलं, यावेळेसही विरोधकांनी पत्रकारांना पाठिंबा देणारे साधे पत्रकही काढले नाही.. का? जनसुरक्षा कायद्याची चर्चा सुरू झाल्यापासून विरोधक अलिप्त का आहेत? संशय घेता येऊ शकेल असे प्रश्न अनेक आहेत. कोण करणार या साऱ्या शंकांचं निरसन? या कायद्यातले धोके विरोधकांना कळले नाहीत की, हा विषयच त्यांना फार महत्वाचा वाटला नाही..? की सारी मिलिभगत आहे? असेही प्रश्न विचारता येऊ शकतात.. जनसुरक्षा कायदा हा नक्षलवाद विरोधी आहे असं महाराष्ट्र सरकार सांगतंय, पण प्रश्न असा आहे की, ज्या पाच राज्यात १५-२० वर्षांपासून हा कायदा अस्तित्वात आहे तेथील नक्षलवाद संपला का? नाही संपला.. त्यामुळे या कायद्याचा उपयोग तिकडे सरकार विरोधी आवाज दडपून टाकण्यासाठीच झाला..महाराष्ट्रात तेच होणार आहे. या कायद्याचा धोका राजकीय पक्षांपेक्षा चळवळीतल्या कार्यकर्त्यांना, संविधान रक्षणासाठी लढणाऱ्यांना, चौथ्या स्तंभाचं स्वातंत्र्य अबाधित राहिलं पाहिजे यासाठी लढणाऱ्या पत्रकारांना अधिक आहे मग आपण का याला विरोध करायचा असा प्रश्न विरोधकांना पडला का ? नेमकं काय झालं.. कळत नाही.. देशातील विरोधकांचा अवसानघातकीपणा, जनहिताच्या प्रश्नापासून अलिप्त राहण्याची वृत्ती हेच भाजपचं बलस्थान आहे..विरोधक अडचणीत असतात तेव्हा त्यांना सामाजिक संघटना, पत्रकारांची मदत हवी असते, मात्र जेव्हा सामान्यांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा विरोधक मूग गिळून गप्प असतात..का? हरकत नाही..तेही राजकारण करतात.. करू द्या.. पण ज्यांचा या कायद्याला विरोध आहे अशा समविचारी कार्यकर्त्यांनी एक तातडीची बैठक बोलावून त्यावर मंथन केले पाहिजे.. कायद्याच्या विरोधातली ही लढाई रस्त्यावर उतरून करायची की न्यायालयात? यावर चर्चा होऊन निर्णय झाला पाहिजे..कायद्यातील तरतुदींचं गांभीर्य सर्वांनी लक्षात घेतलं पाहिजे.. विरोधकांकडून आता फार अपेक्षा कोणी करू नये असेही एस.एम.देशमुख यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान...

स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र

वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**